आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२३ मे २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- रिझर्व बँकेकडून २०२४-२५ या वर्षासाठी केंद्रसरकारला २ लाख ६८ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त लाभांश जाहीर

- गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार, तर छत्तीसगडमध्ये ३३ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

- मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा किदांबी श्रीकांत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

**आणि**

- येत्या दोन-तीन दिवसात दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र, घाट क्षेत्र तसंच कर्नाटक किनारपट्टी आणि गोव्यात मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ईशान्येकडच्या राज्यांमधे गुंतवणुकीच्या संधी उलगडून दाखवणाऱ्या उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. ईशान्येकडच्या राज्यांमधे निसर्गाचं जतन आणि संवर्धन लोकपरंपरेनं केलं असून तिथलं आरोग्यदायी वातावरण गुंतवणुकदारांसाठी एक आकर्षण असल्याचं ते म्हणाले...

**होल्ड- बाईट-- प्रधानमंत्री**

ईशान्येकडच्या राज्यांमधे पायाभूत सोयीसुविधांचा विकास झाला असल्याचं ईशान्य क्षेत्र विकास विभागाचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. या परिसरात १७

विमानतळ आणि दोन हजाराहून अधिक विमान उड्डाण सेवा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं केंद्रसरकारला २ लाख ६८ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त लाभांश २०२४-२५ या वर्षासाठी जाहीर केला आहे. बँकेच्या संचालकमंडळाची ६१६वी बैठक आज मुंबईत गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षते खाली झाली. त्यावेळी हा प्रस्ताव मंजूर झाला.

संचालक मंडळाने गेल्या १५ मे रोजी संमत केलेल्या सुधारित आर्थिक भांडवली निकषांनुसार ही रक्कम ठरवली असून त्यात अवलंबित जोखीम रक्षक कंटिंजंट रिस्क बफर साडेसात ते साडेचार टक्के पर्यंत  ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखालचं  शिष्टमंडळ आज **रशियाची** राजधानी मॉस्को इथं  पोहोचलं. भारत दहशतवादी हल्ल्यांना तोंड देत असताना रशियाशी संपर्क राखणं अत्यंत महत्त्वाचं आहे, असं **कनिमोळी** यांनी मॉस्को इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. हे शिष्टमंडळ यानंतर स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटवियाला भेट देईल

जनता दलाचे खासदार **संजय झा** यांच्या नेतृत्वाखालच्या  शिष्टमंडळानं जपानची राजधानी  टोकियो इथं  ब्राझील, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, ग्रीस आणि दक्षिण कोरियाच्या राजदूतांशी संवाद साधला. शिवसेना खासदार **डॉ. श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं  दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेवर भर देण्यासाठी संयुक्त अरब अमिराती मधल्या उच्चाधिकाऱ्यांबरोबर अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या. खासदार बैजयंत पांडा, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालची  इतर तीन शिष्टमंडळं उद्या, तर  खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ परवा विविध देशांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल सेनादलांप्रति अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, तसंच त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी ठीकठिकाणी तिरंगा रॅली काढली जात आहे. त्या अनुषंगानं सातारा जिल्ह्याते राष्ट्रपती पदक विजेते माजी सैनिक शंकर माळवदे यांनी दिलेली प्रतिक्रिया ऐकू या ….

**होल्ड -बाईट - माळवदे**

बुलढाणा जिल्ह्यात लोणार इथं आज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत शिवसेनेनं तिरंगा रॅली आयोजित केली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातल्या जंगलात आज नक्षलवादी आणि पोलिसांत चकमक झाली. या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले असून त्यात भामरागड दलमचा कमांडरचा आणि एका महिला नक्षलवाद्याचा समावेश आहे.

भामरागड तालुका आणि छत्तीसगड सीमेवर कवंडे गावात नक्षलवादी लपून असल्याची माहिती मिळाल्यावरुन संयुक्त शोध मोहिम सुरू केली होती. ही मोहिम सुरू असताना आज सकाळी नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात चार नक्षलवादी मारले गेले. चकमक झालेल्या ठिकाणी मोठा शस्त्रसाठा हाती लागला.

मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटली असून त्यात भामरागड दलमचा कमांडर सन्नू पुंगाटी याचा समावेश आहे. त्याच्यावर आठ लाख रुपयांचं बक्षिस होतं. तर अन्य तिघं हे दलमचे सदस्य असून त्यांच्यावर प्रत्येकी दोन लाखांचं बक्षिस होतं. मारलेल्या नक्षलवाद्यांमध्ये एका महिलेचा समावेश असल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज एकूण ३३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यांच्यावर सुमारे ९० लाख रूपयांचं बक्षिस होतं. विजापूर जिल्ह्यात २४ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. गोळीबार, आईडी स्फोट, जाळपोळ यासारख्या प्रकरणांमध्ये त्यांचा हात होता, असं पोलीस अधिक्षकांनी सांगितलं.

दंतेवाडा जिल्ह्यात ९ माओवाद्यांनी पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. त्यापैकी चौघांवर साडेतीन लाखांचं बक्षिस होतं. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार या सर्व माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रूपये दिले जाणार आहेत.

<><><><><>

मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदांबी श्रीकांतनं आज पुरुष एकेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात फ्रान्सच्या तोमा जुनिअर पोपोवला नमवत श्रीकांतनं उपांत्य फेरीत आगेकूच केली आहे.

भारताच्या मिश्र दुहेरीची तनिषा क्रॅस्टो आणि ध्रुव कपिल या जोडीला मात्र आज पराभव पत्करावा लागला. चीनच्या वेई याक्सिन आणि जियांग झेनबॅग या जोडीनं त्यांच्यावर २४-२२, २१-१३ असं अशी मात केली. त्यामुळं तनिषा क्रॅस्टो आणि ध्रुव कपिल या जोडीचं आव्हान संपुष्टात आलं असून श्रीकांत हा या स्पर्धेत टिकून राहिलेला एकमेव भारतीय बॅडमिंटनपटू ठरला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ इथं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायजर्स हैदराबाद यांचा सामना सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा सनरायजर्स हैदराबाद संघाच्या ७ षटकात २ बाद ८४ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

येत्या दोन-तीन दिवसात दक्षिण कोकण, कर्नाटकच्या किनारपट्टी आणि घाट क्षेत्रात तसंच मध्य महाराष्ट्र आणि गोवा इथं मुसळधार पावसाची शक्यता असल्यानं हवामान विभागानं रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, पश्चिम राजस्थानात पुढील

दोन ते तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता असून काही भागांत धुळीचे वादळ येण्याचीही शक्यता आहे.

तर, दिल्ली आणि परिसरात वादळ, वीज कडाडण्यासह हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता असल्याने लोकांना उष्णतेपासून दिलासा मिळणार आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात शेताच्या बांधावरचे पारंपरिक अरुंद शेतरस्ते आता ३ ते ४ मीटर, म्हणजे जवळपास १२ फूट रुंद करण्याचा क्रांतिकारी निर्णय महसूल विभागानं घेतला आहे. याबाबतचा शासन आदेश जारी केला असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. शेतरस्त्यांच्या जागांमध्ये अतिक्रमण होऊ नये, तसंच भविष्यात खरेदी विक्रीच्यावेळी अन्य शेतीविषयक वाद उद्भवू नयेत म्हणून या शेतरस्त्याची नोंद जमिनीच्या ७/१२मध्ये केली जाणार आहे.

हे शेतरस्ते जलदगतीनं पूर्ण करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या प्रकरण निकाली काढण्याबाबत शासन आदेश जारी केले आहेत.

<><><><><>

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात फरार असलेलल्या राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे या दोन आरोपींना पोलिसांनी आज अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं दोघांना २८ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

//<><><><><>//